७ दैनिक जनप्रवास सांगली
बातम्यांचा राजा
रविवार, दि. १७ फेब्रुवारी २०१९
Website : janpravas.in

# महाडिक अभियांत्रिकीच्या रईसा मुल्लाचे मैदानी स्पर्धेत यश

इस्लामपूर • प्रतिनिधी

येथील नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थीनी रईसा नुराब्वास मुल्ला हिने वारणानगर येथे पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या लीड कॉलेज अंतर्गत मैदानी स्पर्धेमध्ये विविध खेळ प्रकारात विशेष प्राविण्य प्राप्त केले. या मैदानी स्पर्धेमध्ये सांगली, कोल्हापूर जिल्हयातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील खेळाडू सहभागी झाले होते. महाडिक अभियांत्रिकीची रईसा मुल्ला हिने गोळा फेक व ४०० मीटर धावणे या खेळप्रकारात प्रथम क्रमांक तर २०० मीटर धावणे या खेळप्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल रईसाचे व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक, कार्यकारी संचालक प्रा.महेश जोशी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. रईसाला महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण संचालक प्रा.संदीप पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.